# बेधुंद चांदरात

(चाल :
आजा सनम, मधुर चांदनीमे हम)

चांदरातिं या
तू नि मी मिळुनियां
शुष्क माळावर या
ये वसंत फुलवुया
गीत गात गगन झुलवुया।
गीत गात गगन झुलवुया।

प्रीत बावरी
एक आस अंतरी
चांदण्यांच्याहि पार
जाउं, विहरुं अंबरीं
करमेना भूवरी प्रिया।
करमेना भूवरी प्रिया।

चिंब निथळत्या रातिं तू
धुंद मनाला साथ दे।
बावरतां प्रीतसागरीं
तूच जिवाला हात दे।
चंद्र साक्ष देतसे, प्रेम लाविते पिसे,
खबर उद्याची नसे, तू नि मी कुठे, कसे?
चंद्र साक्ष देतसे, प्रेम लाविते पिसे,
खबर उद्याची नसे, तू नि मी कुठे, कसे?

चांदरातिं या
तू नि मी मिळुनियां
शुष्क माळावर या
ये वसंत फुलवुया
गीत गात गगन झुलवुया।
गीत गात गगन झुलवुया।

प्रीत बावरी
एक आस अंतरी
चांदण्यांच्याहि पार
जाउं, विहरुं अंबरीं
करमेना भूवरी प्रिया।
करमेना भूवरी प्रिया।

मन आनंदें हांसलें
मेघ बनुनि झेपावलें।
नवथर नभ धरणीवरी
नवरी नटुनी पातलें।
चांदपालखी सजे, तारांगण गजबजे,
जग सारे कुजबुजे, गूज गोड हृदयिं जें
चांदपालखी सजे, तारांगण गजबजे,
जग सारे कुजबुजे, गूज गोड हृदयिं जें

चांदरातिं या
तू नि मी मिळुनियां
शुष्क माळावर या
ये वसंत फुलवुया
गीत गात गगन झुलवुया।
गीत गात गगन झुलवुया।

प्रीत बावरी
एक आस अंतरी
चांदण्यांच्याहि पार
जाउं, विहरुं अंबरीं
करमेना भूवरी प्रिया।
करमेना भूवरी प्रिया।

डॉ. उज्ज्वला दळवी
–सौदी अरेबिया
कोजागिरी २००८.